# न्यूज एक्सप्रेस मराठी

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२




# महापालिकेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बदल्या रखडल्या

## महापालिकेत सलग सहा वर्षे एकाच टेबलवर बसलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचा प्रश्न ऐरणीवर

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेत सलग सहा वर्षे किंवा त्याहून अधिक काळ एकाच टेबलवर आणि एकाच विभागात ठाण मांडून बसलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचा विषय पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. महापालिकेच्या स्वतःच्या आकडेवारीनुसार प्रशासनातील तब्बल २०० हून अधिक कर्मचारी आणि अधिकारी नियमानुसार बदलीस पात्र ठरले आहेत. मात्र, मे महिना संपत आला तरी महापालिका आयुक्त विजय सूर्यवंशी यांनी अद्याप या पात्र कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश काढलेले नाहीत. त्यामुळे पालिकेच्या वर्तुळात उलट-सुलट चर्चांना उधाण आले असून, बदल्यांची ही प्रक्रिया का रखडली, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.



महापालिकेच्या सेवा नियमांनुसार आणि शासकीय धोरणानुसार, पारदर्शकता राखण्यासाठी आणि भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी कर्मचाऱ्यांच्या दर तीन ते सहा वर्षांनी बदल्या करणे बंधनकारक असते. सामान्यतः दरवर्षी एप्रिल आणि मे महिन्यात या बदल्यांची प्रक्रिया पूर्ण केली जाते, जेणेकरून कर्मचाऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणावर किंवा कौटुंबिक व्यवस्थेवर त्याचा विपरीत परिणाम होत नाही. चालू वर्षातील मे महिना अंतिम टप्प्यात आला असतानाही आयुक्तांकडून यावर कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. यामुळे ६ वर्षांपेक्षा जास्त काळ एकाच ठिकाणी काम करणारे कर्मचारी निर्धास्त झाले असून, बदल्यांच्या प्रतीक्षेत असलेल्या प्रामाणिक कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

एकाच विभागात दीर्घकाळ ठाण मांडून बसलेल्या अनेक कर्मचाऱ्यांचे आणि अधिकाऱ्यांचे काही विशिष्ट विभागांवर वर्चस्व निर्माण झाले आहे. विशेषतः बांधकाम, पाणीपुरवठा, कर संकलन आणि भूमी जिंदगी यांसारख्या महत्त्वाच्या व 'मलईदार' मानल्या जाणाऱ्या विभागांमध्ये अनेक वर्षांपासून ठाण मांडून बसलेले अधिकारी जागेवरून हलण्यास तयार नाहीत.

अनेक वजनदार कर्मचाऱ्यांनी आपल्या बदल्या रोखण्यासाठी राजकीय नेत्यांमार्फत आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत जोरदार 'फिल्डिंग' लावली आहे. याच दबावामुळे आयुक्त विजय सूर्यवंशी यांनी अद्याप बदल्यांच्या फाईलवर स्वाक्षरी केली नसल्याची जोरदार चर्चा पालिका वर्तुळात आहे.

एकाच पदावर अनेक वर्षे काम केल्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये मक्तेदारी निर्माण होते आणि नागरिकांच्या तक्रारींचे निवारण होण्यास विलंब लागतो, असे अनेकदा समोर आले आहे. प्रशासनात गतिमानता आणि पारदर्शकता आणण्यासाठी बदल्यांची गरज असते. मात्र, २०० हून अधिक कर्मचारी पात्र असूनही त्यांना अभय का दिले जात आहे, असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. एका बाजूला पारदर्शक कारभाराचा दावा करायचा आणि दुसऱ्या बाजूला नियमांना बगल देऊन बदल्या रोखून धरायच्या, यामुळे महापालिका प्रशासनाच्या भूमिकेवर मोठी शंका उपस्थित केली जात आहे.

### आयुक्त कधी घेणार निर्णय?

**» बदलीस पात्र असलेल्या कर्मचाऱ्यांची यादी सामान्य प्रशासन विभागाने आधीच तयार केली आहे. आता केवळ आयुक्त विजय सूर्यवंशी यांच्या अंतिम मंजुरीची प्रतीक्षा आहे. मे महिना संपण्यापूर्वी या बदल्या होणार की राजकीय दबावापुढे झुकून हे आदेश पुढील वर्षापर्यंत प्रलंबित ठेवले जाणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. महापालिकेतील ही प्रशासकीय मरगळ झटकण्यासाठी आयुक्तांनी तात्काळ धाडसी निर्णय घेत या प्रलंबित बदल्या मार्गी लावाव्यात, अशी मागणी जोर धरत आहे.**

# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात 27 मे ते 9 जूनपर्यंत प्रतिबंधात्मक आदेश जारी

## कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस प्रशासनाचा निर्णय; विनापरवानगी सभा-मिरवणुकांवर बंदी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात शांतता व सुव्यवस्था राखणेकामी पोलीस सह आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, यांनी प्राप्त अधिकाराचा वापर करुन व महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन 1951 चे कलम 37 (1) व (3) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात 27 मे 2026 रोजी 00.01 पासून ते 9 जुन 2026 रोजी 24 वाजेपर्यंत खाली नमूद केलेली कृत्य करण्यास या आदेशान्वये मनाई करीत आहे.



कोणताही दाहक पदार्थ अथवा स्फोटक पदार्थ द्रव्य बरोबर नेणे. दगड अथवा शस्त्रे किंवा अस्खे सोडावयाची अस्त्रे किंवा फेकावयाची हत्यारे अगर साधने बरोबर नेणे. शस्त्रे, सोटे, भाले, तलवारी, दंड, काठ्या, बंदुका व शारिरीक इजा करण्यासाठी वापरात येईल अशी कोणतीही वस्तू बरोबर नेणे. कोणत्याही इसमाचे चित्राचे प्रतिकात्मक प्रेताचे किंवा पुढा-यांचे चित्राचे प्रतिमेचे प्रदर्शन व दहन करणे. मोठ्याने अर्वाच्य घोषणा देणे, वाद्य वाजविणे. ज्यामुळे सभ्यता अगर नितिमत्ता यास धोका पोहचेल किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा राज्य उलथवून देण्यास प्रवृत्त करेल अशी आवेशपूर्ण भाषणे करणे किंवा अविर्भाव करणे कोणतेही जिन्नस तयार करुन त्याचा जनतेत प्रसार करणे. ज्या योगे वरील परिसरात कायदा व सुव्यवस्था धोक्यात येईल अशा पध्दतीने कलम 37(1) व (3) विरुध्द वर्तन करणे. कलम 37 चे पोटकलम (3) अन्वये पाच पेक्षा जास्त लोकांचा जमाव करणे, तसेच पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांचे पुर्व परवानगी शिवाय सभा घेणे किंवा मिरवणुका काढणेस बंदी घालण्यात येत आहे.

वरील संपूर्ण आदेश हा शासनाच्या सेवेतील व्यक्तींना व ज्यांना आपल्या वरीष्ठांच्या आदेशानुसार कर्तव्यपुर्तीसाठी हत्यार वाळगणे आवश्यक आहे व त्याबाबत परवानगी आहे त्यांना लागू होणार नाही. या आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधित व्यक्ती महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन 1951 चे कलम 135 प्रमाणे शिक्षेस पात्र होईल.

# ‘गोल्डन अवर’ धोक्यात; पिंपरी-चिंचवडमध्ये रुग्णवाहिकांना विलंब

## वाहतूककोंडीमुळे ‘गोल्डन अवर’ धोक्यात; रुग्णांचे जीव संकटात येण्याची शक्यता वाढली

**पिंपरी | प्रतिनिधी**

वैद्यकीय क्षेत्रात अत्यंत महत्त्वाचा मानला जाणारा ‘गोल्डन अवर’ रस्त्यावरच खर्ची पडत असल्याने रुग्णांच्या जीविताचा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे. वाढती वाहनसंख्या आणि अपुरी वाहतूक शिस्त यामुळे आपत्कालीन सेवांचा वेग मंदावला असून, यावर ठोस उपाययोजनांची गरज व्यक्त होत आहे. अशा परिस्थितीत शहरातील रुग्णवाहिका खरोखरच वेळेत रुग्णालय गाठू शकतात का? हा प्रश्न उपस्थित होत आहे

वाहतूक नियमांनुसार रुग्णवाहिकेला प्राधान्य देणे बंधनकारक असले तरी अनेक वाहनचालक सायरनकडे दुर्लक्ष करत असल्याचे चित्र आहे. काही जण कानात इअरफोन लावून वाहन चालवतात. तर, काही जण रुग्णवाहिकेच्या मागे जागा मिळवण्यासाठी धोकादायक पद्धतीने वाहन चालवत असल्याचेही दिसून येते. ज्यामुळे पुन्हा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.



### गोल्डन अवर म्हणजे काय ?

» अपघात किंवा गंभीर वैद्यकीय परिस्थितीनंतरचा पहिला एक तास हा रुग्णासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. या कालावधीत उपचार मिळाल्यास रुग्णाचे प्राण वाचण्याची शक्यता अधिक असते. मात्र, वाहतूक कोंडीमुळे हा अमूल्य वेळ रस्त्यावरच वाया जात असल्याची भीती व्यक्त होत आहे.

हृदयविकाराच्या झटक्यात प्रत्येक मिनिटाला हृदयाच्या पेशींचे नुकसान वाढते. ब्रेन स्ट्रोकमध्ये उपचाराला उशीर झाल्यास कायमस्वरूपी अपंगत्वाचा धोका वाढतो. तर, गंभीर अपघातातील रक्तस्राव असलेल्या रुग्णासाठी वेळेवर उपचारच जीवन-मृत्यूचा फरक ठरू शकतात. त्यामुळे रुग्णवाहिकेला दिलेला मार्ग हा केवळ वाहतूक शिस्तीचा भाग नसूनख एक सामाजिक कर्तव्य आहे. शहरातील काही प्रमुख चौकांमध्ये रुग्णवाहिका सायरन वाजवत पुढे जाण्याचा प्रयत्न करत असतानाही वाहनांच्या लांबच लांब रांगा दिसतात. काही वाहनचालक बाजूला सरकत असले तरी रस्त्यावरील अतिक्रमण, बेशिस्त पार्किंग आणि खड्ड्यांमुळे रुग्णवाहिकेचा वेग मंदावतो

शहरातील वाढती वाहतूककोंडी आता केवळ नागरिकांच्या वेळेचाच नाही, तर थेट जीविताचाही प्रश्न बनू लागली आहे. अपघात, हृदयविकाराचा झटका, गंभीर आजार किंवा इतर आपत्कालीन परिस्थितीत रुग्णाला तातडीने उपचार मिळणे आवश्यक असते. वैद्यकीय भाषेत महत्त्वाचा मानला जाणारा गोल्डन अवर वाचवण्यासाठी रुग्णवाहिका वेगाने रुग्णालयात पोहोचणे गरजेचे असते. मात्र, शहरातील प्रमुख चौक, अरुंद रस्ते, बेशिस्त पार्किंग आणि वाहनांच्या वाढत्या गर्दीमुळे रुग्णवाहिका अनेकदा वाहतूक कोंडीत अडकताना दिसत आहेत.

### ग्रीन कॉरिडॉरची गरज

» गंभीर रुग्णांसाठी वाहतूक पोलिसांकडून काही वेळा ग्रीन कॉरिडॉर किंवा संजीवनी मूव्हमेंट तयार केला जातो. मात्र, दैनंदिन आपत्कालीन सेवांसाठी कायमस्वरूपी यंत्रणा उभी करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. प्रमुख रुग्णालयांच्या परिसरात स्वतंत्र आपत्कालीन मार्ग, स्मार्ट सिग्नल व्यवस्था आणि अतिक्रमणमुक्त रस्ते आवश्यक असल्याचे मत नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

### अतिक्रमणामुळे परिस्थिती गंभीर

» शहरातील मुंबई-पुणे महामार्ग, भोसरी, निगडी, आकुर्डी, चिंचवड, पिंपरी, दापोडी, सांगवी, हिंजवडी तसेच बीआरटी मार्गालगतच्या चौकांमध्ये सकाळी आणि संध्याकाळी मोठ्या प्रमाणावर वाहतूककोंडी होत असल्याचे चित्र आहे. अशा परिस्थितीत सायरन वाजवत धावणाऱ्या रुग्णवाहिकेलाही मार्ग मिळत नसल्याने रुग्णांचे नातेवाईक संताप व्यक्त करत आहेत. काही ठिकाणी वाहनचालक रुग्णवाहिकेला जागा देण्याचा प्रयत्न करत असले तरी अरुंद रस्ते आणि अतिक्रमणामुळे परिस्थिती गंभीर बनत आहे.

# हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो प्रकल्पात सौरऊर्जा वापर; दरवर्षी 20 कोटींची बचत

## आधुनिक थर्ड रेल सिस्टीममुळे वार्षिक वीज खर्चात मोठी बचत होणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणच्या (पीएमआरडीए) हिंजवडी ते शिवाजीनगर या पुणेरी मेट्रो प्रकल्पात पर्यावरणपूरक आणि ऊर्जा बचतीवर आधारित अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यात आला आहे. सौर ऊर्जा आणि थर्ड रेल सिस्टीमच्या वापरामुळे मेट्रोच्या वार्षिक वीज खर्चात सुमारे 20 कोटी रुपयांची बचत होणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

या मार्गावरील सर्व 23 उन्नत स्थानकांवर तसेच कार डेपोच्या छतांवर सौर ऊर्जा पॅनेल्स बसवण्यात येत आहेत. एकूण 11 मेगावॅटपेक्षा अधिक क्षमतेचे सोलर प्लांट उभारले जात असून, त्यातून निर्माण होणारी वीज स्थानकांवरील दिवे, लिफ्ट, एस्कलेटर आणि वातानुकूलित यंत्रणांसाठी वापरली जाणार आहे. ही यंत्रणा मुख्य वीज ग्रीडशी जोडण्यात येणार असल्याने विजेचा कार्यक्षम वापर शक्य होणार आहे.



हा प्रकल्प रेस्को मॉडेलवर राबवण्यात येत असल्याने पीएमआरडीएला प्रारंभी कोणताही भांडवली खर्च करावा लागलेला नाही. खासगी कंपनीने स्व:खर्चाने सौर यंत्रणा उभारून तिची देखभालही स्वीकारली आहे.

मेट्रोच्या डब्यांची निर्मिती हलक्या ॲल्युमिनियम धातूपासून करण्यात आली असून, त्यामध्ये री-जनरेटिव्ह ब्रेकिंग तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. त्यामुळे ब्रेक लावताना निर्माण होणारी अतिरिक्त वीज पुन्हा वापरता येणार आहे.

याशिवाय, शहराचे सौंदर्य टिकवण्यासाठी ओव्हरहेड तारांऐवजी आधुनिक थर्ड रेल सिस्टीमचा वापर करण्यात आला आहे. 750 व्होल्ट डीसी वीजप्रवाह असलेल्या या प्रणालीद्वारे मेट्रो गाड्यांना थेट वीजपुरवठा केला जाणार असून, ही यंत्रणा सुरक्षित आणि कार्यक्षम मानली जाते.

### ऊर्जा बचतीला चालना

» हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो प्रकल्पात अत्याधुनिक आणि पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा वापर करून ऊर्जा बचतीवर विशेष भर देण्यात आला आहे. सर्व स्थानकांवर आणि कार डेपोवर उभारण्यात येणाऱ्या सौर ऊर्जा प्रकल्पांमुळे मोठ्या प्रमाणावर विजेची बचत होणार आहे. याशिवाय, थर्ड रेल सिस्टीम आणि री-जनरेटिव्ह ब्रेकिंग तंत्रज्ञानामुळे मेट्रो अधिक कार्यक्षम आणि सुरक्षित बनणार आहे. या आधुनिक तंत्रज्ञानामुळे दरवर्षी सुमारे 20 कोटी रुपयांची वीज बचत अपेक्षित आहे. पुण्यासारख्या वेगाने विकसित होणाऱ्या शहरासाठी हा प्रकल्प पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत वाहतुकीचा आदर्श ठरणार असल्याचे मानले जात आहे.

# पुण्यात घरभेटींचे काम संथ; 11 हजार प्रगणकांवर प्रशासनाचा कडक इशारा

## घरयादी तयार करण्यात ढिलाई; 1,600 पर्यवेक्षकांची तातडीची बैठक, कामचुकारांवर फौजदारी कारवाईचा इशारा

**पुणे | प्रतिनिधी**

देशासाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या 'जनगणना 2027' च्या पहिल्या टप्प्यातील घरयादी तयार करण्याचे काम पुण्यात संथ गतीने सुरू असल्याबद्दल प्रशासनाने कमालीची कडक भूमिका घेतली आहे. प्रत्यक्ष घरभेटींद्वारे माहिती संकलनाचे काम अपेक्षित गतीने होत नसल्याचे समोर आल्यानंतर, महापालिका प्रशासनाने शनिवारी सकाळी गणेश कला क्रीडा केंद्र येथे तब्बल 1,600 पर्यवेक्षकांची तातडीची आढावा बैठक घेऊन कामचुकारांना तीव इशारा दिला आहे

या बैठकीत शहरात कार्यरत असलेल्या सुमारे 11,000 प्रगणकांकडून सुरू असलेल्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यामध्ये अनेक भागांत प्रत्यक्ष घरभेटी आणि माहिती संकलनाची प्रगती असमाधानकारक असल्याचे निदर्शनास आले. या पार्श्वभूमीवर, प्रगणकांना क्षेत्रीय स्तरावर काम करताना येणाऱ्या विविध तांत्रिक अडचणी, जनगणनेच्या मोबाईल ॲपचा वापर आणि कामकाजाची प्रत्यक्ष प्रक्रिया यावर चर्चा करण्यात आली, तसेच त्याची सविस्तर चर्चा करण्यात आली.

. शहरातील माहिती संकलन अपेक्षित वेगाने होत नसल्याचे लक्षात आल्यानंतर शनिवारी गणेश कला क्रीडा केंद्र येथे 1,600 पर्यवेक्षकांची विशेष आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत सुमारे 11 हजार प्रगणकांच्या कामाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे आणि जनगणना संचालनालयाचे सहसंचालक राजेश भोसले यांनी प्रगणकांना दररोज घरभेटी घेऊन अचूक माहिती संकलन करण्याच्या सूचना दिल्या.

अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त ओमप्रकाश दिवटे आणि जनगणना संचालनालयाचे सहसंचालक राजेश भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक पार पडली. या वेळी सर्व चार्ज ऑफिसर्स आणि पर्यवेक्षकांना आपापल्या कार्यक्षेत्रातील प्रगणकांवर दररोज काटेकोर लक्ष ठेवण्याचे आदेश देण्यात आले. दररोजच्या कामाचा अहवाल सादर करून घरभेटीचे नियोजनबद्ध काम निश्चित कालमर्यादेत आणि अत्यंत अचूकतेने पूर्ण करण्याच्या सूचना या बैठकीत देण्यात आल्या.




### नागरिकांना महापालिका प्रशासनाचे सहकार्याचे आवाहन

**» जनगणनेचे हे काम देशहिताचे व राष्ट्रीय महत्त्वाचे असल्याने नागरिकांनी आपल्या घरी येणाऱ्या प्रगणकांना कोणतीही भीती न बाळगता संपूर्ण आणि अचूक माहिती देऊन या राष्ट्रीय उपक्रमात आपले योगदान द्यावे, असे आवाहन महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी नवल किशोर राम आणि अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांनी नागरिकांना केले आहे.**

### काम न केल्यास थेट तुरुंगवास!

**» बैठकीमध्ये विनापरवानगी गैरहजर राहणाऱ्या आणि कामात कसूर करणाऱ्या कर्मचाऱ्यांबाबत प्रशासनाने तीव संताप व्यक्त केला. 'जनगणना कीट' ताब्यात घेऊनही प्रत्यक्ष कामाला सुरुवात न करणारे, तसेच प्रशिक्षणाकडे पाठ फिरवणाऱ्या प्रगणक आणि पर्यवेक्षकांवर कडक कारवाईचा बडगा उगारला जाणार आहे. संबंधितांनी तत्काळ कामावर रुजू न झाल्यास त्यांच्यावर 'जनगणना कायदा 1948' मधील तरतुदींनुसार कडक शिस्तभंग आणि थेट फौजदारी कारवाई केली जाईल, असा सज्जड दम प्रशासनाने दिला आहे.**

### 1,600 पर्यवेक्षकांची तातडीची बैठक

**» देशासाठी महत्त्वाच्या असलेल्या 'जनगणना 2027' च्या पहिल्या टप्प्यातील घरयादी तयार करण्याच्या कामाला अधिक गती देण्यासाठी पुणे महापालिका प्रशासनाने कडक पावले उचलली आहेत. शहरातील माहिती संकलन अपेक्षित वेगाने होत नसल्याचे लक्षात आल्यानंतर शनिवारी गणेश कला क्रीडा केंद्र येथे 1,600 पर्यवेक्षकांची विशेष आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत सुमारे 11 हजार प्रगणकांच्या कामाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे आणि जनगणना संचालनालयाचे सहसंचालक राजेश भोसले यांनी प्रगणकांना दररोज घरभेटी घेऊन अचूक माहिती संकलन करण्याच्या सूचना दिल्या.**

# 24 बाय 7 पाणीपुरवठा योजनेवर पाणीचोरांचा डल्ला

## धायरी रायकर मळा परिसरात मध्यरात्री पाईपलाईन फोडून पाणीचोरीचा प्रयत्न; हजारो लिटर पाणी वाया

**पुणे | प्रतिनिधी**

शहराचा पाणीपुरवठा सुरळीत राहून गळती रोखण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्चून राबवल्या जाणाऱ्या '24 बाय 7' पाणीपुरवठा योजनेलाच आता पाणीचोरांनी लक्ष्य केले आहे. धायरी परिसरातील रायकर मळा येथे गुरुवारी मध्यरात्री मुख्य जलवाहिनीलाच प्लंबरच्या मदतीने छिद्र पाडून अनधिकृत नळजोडणी (पाणीचोरी) घेण्याचा प्रकार उघडकीस आला. ही जोडणी करताना मुख्य जलवाहिनी फुटल्याने हजारो लिटर पिण्याचे पाणी वाया गेले.

हा गंभीर प्रकार दुसऱ्या दिवशी उघडकीस आला. सकाळी पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी आल्यावर त्यांनी पाणीगळती रोखली. मध्यरात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन मुख्य पाइपलाइनवर अनधिकृत कनेक्शन घेण्याची ही घटना गंभीर आहे. यासाठी चक्क व्यावसायिक प्लंबरचा वापरला. मात्र, पाणीचोरी करताना अचानक पाइपलाइन फुटल्याने चोरांची तारांबळ उडाली आणि ते प्लंबिंगचे साहित्य घटनास्थळीच टाकून पसार झाले.

शहरात 24 तास समान पाणीपुरवठा व्हावा म्हणून संपूर्ण पुण्यात जलवाहिन्यांचे जाळे आणि पाण्याच्या टाक्या उभारण्याचे काम '24 बाय 7' योजनेअंतर्गत युद्धपातळीवर सुरू आहे. मात्र, या योजनेच्या मुख्य जलवाहिन्या सुरक्षित आहेत का? असा प्रश्न या घटनेने उपस्थित केला आहे. शहरात असे किती अनधिकृत नळजोड आहेत, याबाबत महानगरपालिकेकडे माहिती नाही.



> **मुख्य जलवाहिनीला भगदाड पाडून नळजोड घेणे ही अतिशय गंभीर घटना असून, याप्रकरणी पोलिसांत तक्रार देण्यात येणार आहे. तसेच या परिसरातील अधिकृत व अनधिकृत दोन्ही नळजोडण्यांची तपासणी केली जाणार आहे.**
>
> **- नंदकुमार जगताप, प्रमुख, पाणीपुरवठा विभाग, महापालिका**

> **काळूबाई मंदिर रायकर मळा परिसरात काही जण चोरून पाण्याचे कनेक्शन घेत होते. माहिती मिळताच घटनास्थळी गेलो. मात्र संबंधित लोक पळून गेले. याबाबत सिंहगड रोड क्षेत्रिय कार्यालयाला कळविले. अनधिकृत नळ कनेक्शन घेणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी.**
>
> **- संभाजी पुरी, खडकवासला युवासेना विभागप्रमुख**

# पुण्यात मुसळधार पावसाचा दिलासा; तापमानात तब्बल 7 अंशांची घसरण

## मान्सूनपूर्व पावसाने शहर गारठले; रविवार आणि सोमवारी मुसळधार पावसाचा यलो अलर्ट

**पुणे | प्रतिनिधी**

शहरात शुक्रवारी झालेल्या मुसळधार मान्सूनपूर्व पावसाने शहराचा पारा 40 अंशांवरून थेट 34.7 अंशांवर आला आहे. पारा तब्बल 7 अंशांनी खाली आल्याने मे महिन्यातील हे नीचांकी कमाल तापमान ठरले. दरम्यान, रविवार आणि सोमवारी शहराला मुसळधार पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे

शुक्रवारी शहरातील हडपसर, एनडीए भागात 30 मि.मी., तर चिंचवड भागात 60 मि.मी. पावसाची नोंद झाली. तसेच शिवाजीनगर, पाषाण, लोहगाव शहरातील मध्यवस्ती आणि उपनगरांत सरासरी 13 ते 15 मि.मी. पाऊस पडल्याने रस्त्यांवर पूर आला होता. त्यामुळे शहराचे कमाल तापमान 40 अंशांवरून 34.7 अंशांवर खाली आले होते. मे महिन्यात शहराचे कमाल तपामान प्रथमच इतके खाली आले आहे.

शहरात शुक्रवारी झालेल्या पावसाने बहार आणली. कमाल तापमानात 7 ते 8 अंशांनी घट झाली असून, कमाल, किमान तापमानात खूप कमी अंतर झाले आहे. शहरात बाष्पयुक्त वाऱ्यांचा प्रभाव असून, वेग ताशी 30 ते 35 कि.मी. आहे. त्यामुळे रविवारी आणि सोमवारी (दि. 23 आणि 24 मे) शहराला मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. मुसळधार मान्सूनपूर्व पावसामुळे पुणे शहरातील तापमानात मोठी घट झाली आहे. 40 अंशांवर गेलेला पारा थेट 34.7 अंशांवर आल्याने नागरिकांना प्रचंड उकाड्यापासून दिलासा मिळाला. गेल्या काही दिवसांपासून वाढलेल्या उष्णतेमुळे त्रस्त झालेल्या पुणेकरांनी पावसामुळे समाधान व्यक्त केले.



### पुणेकरांना उकाड्यातून दिलासा

» शुक्रवारी झालेल्या मुसळधार मान्सूनपूर्व पावसामुळे पुणे शहरातील तापमानात मोठी घट झाली आहे. 40 अंशांवर गेलेला पारा थेट 34.7 अंशांवर आल्याने नागरिकांना प्रचंड उकाड्यापासून दिलासा मिळाला. गेल्या काही दिवसांपासून वाढलेल्या उष्णतेमुळे त्रस्त झालेल्या पुणेकरांनी पावसामुळे समाधान व्यक्त केले. शहरातील अनेक भागांत गारवा निर्माण झाला असून वातावरण आल्हाददायक झाले आहे. हवामानातील या बदलामुळे नागरिकांनी संध्याकाळी घराबाहेर पडत पावसाचा आनंद घेतला. मे महिन्यातील हे सर्वात कमी कमाल तापमान ठरल्याने हवामान विभागानेही याची विशेष नोंद घेतली आहे.

### यलो अलर्ट जारी

» पुणे शहरात बाष्पयुक्त वाऱ्यांचा प्रभाव कायम असून हवामान विभागाने रविवार आणि सोमवारी मुसळधार पावसाचा यलो अलर्ट दिला आहे. शहरात ताशी 30 ते 35 किलोमीटर वेगाने वारे वाहत असल्याने वातावरण ढगाळ राहण्याची शक्यता आहे. नागरिकांनी गरज नसल्यास बाहेर पडणे टाळावे तसेच विजांच्या कडकडाटावेळी सुरक्षित ठिकाणी थांबावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार पुढील काही दिवस शहरात पावसाची शक्यता कायम राहणार असून त्यामुळे तापमानात आणखी घट होऊ शकते.

### अनेक भागांत जोरदार पावसाची नोंद

» शुक्रवारी झालेल्या पावसात चिंचवड भागात सर्वाधिक 60 मि.मी. पावसाची नोंद झाली, तर हडपसर आणि एनडीए परिसरात 30 मि.मी. पाऊस पडला. शिवाजीनगर, पाषाण, लोहगाव आणि मध्यवस्ती भागांतही चांगला पाऊस झाला. अचानक सुरू झालेल्या मुसळधार सरींमुळे काही ठिकाणी रस्त्यांवर पाणी साचले आणि वाहतूक मंदावली. अनेक वाहनचालकांना पावसामुळे अडचणींचा सामना करावा लागला. तरीही पावसामुळे हवेत निर्माण झालेला गारवा नागरिकांसाठी सुखद ठरला. मान्सूनपूर्व पावसाने शहरातील वातावरणात सकारात्मक बदल घडवून आणल्याचे चित्र पाहायला मिळाले.

# विरोधी भूमिकेतील "कॉकरोच जनता पार्टी'ला चक्क गृहराज्यमंत्र्यांचीच थाप...

## सोशल मीडियावर धुमाकूळ घालणाऱ्या 'कॉकरोच जनता पार्टी'वर नाव न घेता कदम यांचे सूचक वक्तव्य

**पुणे | प्रतिनिधी**

सत्ताधाऱ्यांबद्दल असंतोष व्यक्त करत समाज माध्यमावर 'कॉकरोच जनता पार्टी"ने सध्या धुमाकूळ घातला आहे. महागाई ,बेरोजगारी , घटत्या रोजगाराच्या संधी या आणि अशा अनेक समस्यांमुळे तरुणाईमध्ये सत्ताधाऱ्यांबद्दल तीव्र नाराजी आहे. या "कॉकरोच जनता पार्टी' विषयी सत्ताधाऱ्यांकडून अद्याप कुठलीही प्रतिक्रिया आली नसली तरी काल पुण्यात एका कार्यक्रमात महाराष्ट्राचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी चक्क आपल्या भाषणात या "कॉकरोच जनता पार्टी'ची पाठच थोपटली.

स्पर्धा परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांच्या कौतुक सोहळ्याला गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी हजेरी लावली होती. आपल्या भाषणात त्यांनी तरुणाई ही देशाची ताकद आहे असे सांगताना चक्क "कॉकरोच जनता पार्टी'वरच नाव न घेता भाष्य केले.

गृहराज्यमंत्र्यांनी आपल्या संपूर्ण भाषणात माजी सरन्यायाधीश आणि "कॉकरोच जनता पार्टी यांचा उल्लेख टाळला असला तरी आपल्याला काय म्हणायचे आहे, हे ठळकपणे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवले.

"एखाद्या तरुणाला छेडले तर काय होते हे आपण पाहिले आहे. एका व्यक्तीने तरुणाला कॉकरोच बोलण्याची हिंमत केली. कॉकरोच काय करू शकतो हे दाखवून दिले आहे. एखादा अणुबॉम्ब जरी फुटला तरी कॉकरोच ला काहीच होत नाही असा हा कॉकरोच असतो. त्यामुळे तरुणाई काय करू शकते, हे आपण गेल्या काही दिवसात पाहत आहोत. म्हणूनच तरुण ही आपल्या देशाची महाराष्ट्राची ताकद आहे. या तरुणाला न्याय देण्याचे काम नक्कीच आम्ही करू' असे वक्तव्य करत एकप्रकारे 'कॉकरोच जनता पार्टी'ला समर्थनच दिल्याचे दिसून आले. त्यांच्या या विधानावर उपस्थित विद्यार्थ्यांनी टाळ्यांचा कडकडाट करत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. मात्र, मंचावर उपस्थित सत्ताधारीऱ्यांनी त्यांच्या या भूमिकेकडे एकप्रकारे सूचक दुर्लक्ष केले.



### तरुणाईचा आवाज बुलंद

» "कॉकरोच जनता पार्टी" या नावाने सोशल मीडियावर सुरू झालेल्या चर्चेमुळे तरुणाईच्या भावना आणि प्रश्न पुन्हा एकदा केंद्रस्थानी आले आहेत. महागाई, बेरोजगारी आणि रोजगाराच्या संधी यांसारख्या विषयांवर युवक आपली मते ठामपणे मांडताना दिसत आहेत. पुण्यातील कार्यक्रमात गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी तरुणांच्या जिद्दीचा उल्लेख करत केलेले वक्तव्य चर्चेचा विषय ठरले. युवकांच्या ताकदीची दखल घेत त्यांच्या भावना समजून घेण्याची गरज असल्याचे मत विविध स्तरांतून व्यक्त होत आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून तरुणाई अधिक सक्रिय होत असून सामाजिक आणि राजकीय विषयांवर आपली भूमिका प्रभावीपणे मांडताना दिसत आहे.